# निर्देशांकांत सलग तिसऱ्या सत्रात वाढ

## सेन्सेक्स २८३, तर निफ्टी ९३ अंकांनी वाढला

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मेटल, वाहन आणि वित्तीय संस्थांच्या शेअरमध्ये गुंतवणूक वाढल्याने बुधवारी (दि. १८) सलग तिसऱ्या सत्रात शेअर निर्देशांकात वाढ नोंदवण्यात आली. सेन्सेक्स २८३ आणि निफ्टी निर्देशांकात ९३ अंकांनी वाढ झाली.

मुंबई शेअर बाजारात (बीएसई) सेन्सेक्स ०.३३ टक्क्यांनी वाढून ८३,७३४ अंकांवर गेला. राष्ट्रीय शेअर बाजारात (एनएसई) निफ्टी निर्देशांक ०.३७ टक्क्यांनी वाढून २५,८१९ अंकांवर स्थिरावला. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.५० आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.३९ टक्क्यांनी वधारला.



सेन्सेक्समध्ये झालेल्या तीनअंकी वाढीमुळे बीएसईतील गुंतवणुकदारांनी दोन लाख कोटी रुपयांची कमाई केली. बीएसईतील २ हजार २०० कंपन्यांच्या शेअर भावात वाढ झाली असून, १ हजार ९०० कंपन्यांच्या शेअर भावात घसरण झाली.

निफ्टी-५० निर्देशांकात ३१ कंपन्यांच्या शेअर भावात वाढ झाली. क्वालिटी वॉल्स ४.९४ टक्के, एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स ३.३७, टाटा स्टील २.९३, आयटीसी २.१५ आणि बजाज ऑटोच्या शेअर भावात १.५६ टक्के वाढ झाल्याने निफ्टी निर्देशांकाला बळ मिळाले.

विप्रो १.७३, इटर्नल १.४७, अदानी एंटरप्राइजेस १.४१, इन्फोसिस १.२६ आणि टेक महिंद्राच्या शेअर भावात १.२५ टक्क्यांनी घट झाल्याने निफ्टीच्या वाढीला लगाम बसला. निफ्टी आयटी निर्देशांक १.२३ टक्क्यांनी खाली आला. मेटल १.३३, पीएसयू बँक १.३१ आणि एफएमसीजी निर्देशांकात १.२१ टक्क्यांनी वाढ झाली. सेन्सेक्स २८३ आणि निफ्टी निर्देशांकात ९३ अंकांनी वाढ झाली.

# नऊ महिन्यांत ५२२ टन सोने आयात

## आवक १८ टक्क्यांनी घटूनही आयातीवरील खर्च दोन टक्क्यांनी वाढला

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

किंमत वाढल्याने एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत सोन्याची आयात तब्बल १८.३ टक्क्यांनी घटून ५२२ टनांवर आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत सोने आयातीवरील खर्च १.८ टक्क्यांनी वाढून ४९.४ अब्ज डॉलरवर गेला आहे. चांदीची आयात ५६ टक्क्यांनी वाढली असून आहे.

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत सोन्याची प्रतिकिलो किंमत वार्षिक २५ टक्क्यांनी वाढून ९४,५५४ डॉलरवर गेली आहे. भारतीय चलनात ही रक्कम ८५ लाख ७२ हजार रुपये होते. गेल्या वर्षी याच कालावधीत सोन्याचा प्रतिकिलो भाव ७५,८७३ डॉलर होता. याच कालावधीत चांदीची किंमत ४६.७ टक्क्यांनी वाढून १ हजार ३५७ डॉलर प्रतिकिलोवर गेली आहे. भारतीय चलनात ही रक्कम १.२३ लाख रुपये होते. गतवर्षी याच कालावधीत चांदीचा प्रतिकिलो भाव ९२५ डॉलर होता. चांदीची आयात ५६ टक्क्यांनी वाढून ५,७२७ टनांवर गेली आहे. चांदीच्या आयातीवरील खर्च ३.४ वरून ७.८ अब्ज डॉलरवर गेला आहे. अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहन, औद्योगिक मागणी वाढल्याने चांदीच्या भावात वाढ झाली आहे. गुंतवणुकीसाठी मागणी वाढल्याने सोन्याच्या भावात वाढ झाली आहे.

**इतर वस्तूंची आयात-निर्यात**

वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी २०२६ मध्ये भारताची व्यापारी माल आणि सेवा क्षेत्राची एकत्रित निर्यात १३.१६ टक्क्यांनी वाढून ८०.४५ अब्ज डॉलर झाली आहे. जानेवारी २०२५ मध्ये दोन्ही क्षेत्रांची निर्यात ७१.०९ अब्ज डॉलर्स होती. या महिन्यात एकूण आयात १८.७७ टक्क्यांनी वाढली आहे. जानेवारी २०२५ मध्ये ७६.४८ अब्ज डॉलर्सची आयात होती. त्यात आता ९०.८३ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढ झाली आहे. भारताची या महिन्यातील व्यापारी माल आणि सेवेची तूट १०.३८ अब्ज डॉलरवर गेली आहे. जानेवारी २०२५ मध्ये ती ५.३९ अब्ज डॉलर होती.

### दर वाढले, आयात रोडावली



● भारताच्या सोने आयातीच्या मूल्यात गेल्या सात वर्षांत बराच बदल झाला आहे. आर्थिक वर्ष २०१९ मध्ये सोन्याचे आयात मूल्य ३२.९१ अब्ज डॉलर्स होते. त्यात २०२५ मध्ये ५८.०१ अब्ज डॉलरपर्यंत वाढ झाली आहे. गेल्या सहा वर्षांत सोन्याच्या मूल्यामध्ये ७६ टक्क्यांची वाढ झाली आहे. याच कालावधीत सोन्याची आयात मात्र वेगाने घटली आहे. आर्थिक वर्ष २०१९ मध्ये ९८२.७२ टन सोन्याची आयात झाली. त्यात आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ७५७.१० टनांपर्यंत घट झाली. या कालावधीत आयात २३ टक्क्यांनी घटली.

## महत्त्वाचे

### एआय, रोबोटिक्स स्टार्टअप्समध्ये १५ कोटी डॉलर्सची गुंतवणूक

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

क्वालकॉम इन्कॉर्पोरेटेडने तंत्रज्ञान आणि एआय स्टार्टअप परिसंस्थेला पाठिंबा देण्यासाठी १५ कोटी डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली. क्वालकॉम व्हेंचर्समार्फत सर्व स्तरांवरील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली जाणार आहे. विशेषतः एआय ऑटोमोटिव्ह, आयओटी, रोबोटिक्स आणि मोबाईल क्षेत्रांमध्ये अधिक गुंतवणूक केली जाईल. क्वालकॉमच्या भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रातील दीर्घकालीन बांधिलकीचे हे प्रतीक आहे. क्वालकॉमचे सीईओ क्रिस्टियानो अमोन यांनी दिल्लीतील इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये ही घोषणा केल. अमोन म्हणाले की, स्मार्टफोन, पीसी, गाड्या, औद्योगिक यंत्रे, रोबोट्स आणि इतर अनेक गोष्टींमध्ये एआयचा अंतर्भाव केला जात आहे. हा बदल संपूर्ण उद्योगांना नव्याने आकार देईल.



### ३१०० कोटींचा आयपीओ पुढील आठवड्यात उघडणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

रिन्यूएबल क्षेत्रातील कंपनी क्लीन मॅक्स एन्व्हायरो एनर्जी सोल्युशन्सने त्यांच्या आयपीओसाठी प्रति शेअर १,००० रुपये ते १,०५३ रुपये असा किंमत पट्टा अंतिम केला आहे. क्लीन मॅक्स एन्व्हायरो आयपीओ सामान्य गुंतवणूकदारांसाठी २३ फेब्रुवारी रोजी खुला होईल आणि २५ फेब्रुवारी रोजी बंद होईल. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोलीची तारीख आयपीओ उघडण्याच्या एक दिवस आधी म्हणजे २० फेब्रुवारी २०२६ असेल. क्लीन मॅक्स एन्व्हायरो एनर्जी सोल्युशन्स या आयपीओद्वारे ३,१०० कोटी रुपये उभारणार आहे. क्लीन मॅक्स एन्व्हायरो आयपीओमध्ये १.१४ कोटी नवीन शेअर्सची विक्री करून १२०० कोटी रुपये उभारले जाणार आहेत. तर ऑफर फॉर सेलमध्ये १.८० कोटी शेअर्सची विक्री करून १,९०० कोटी रुपये उभारले जातील. गुंतवणूकदार किमान १४ शेअर्सच्या लॉटसाठी बोली लावू शकतात.

### विक्रीच्या काळात एलआयसीची आयटी क्षेत्रात मोठी गुंतवणूक

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

फेब्रुवारी महिन्यातील जवळजवळ प्रत्येक ट्रेडिंग दिवस आयटी क्षेत्रातील कंपन्यांसाठी वाईट ठरला आहे. आयटी शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. अनेक गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात विक्री केली. १८ फेब्रुवारी रोजी इन्फोसिस आणि टेक महिंद्रासह अनेक आयटी शेअर्स २% पेक्षा जास्त घसरले. मात्र देशातील सर्वात मोठी संस्थात्मक गुंतवणूकदार एलआयसीने आयटी शेअर्समध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. एलआयसीच्या पोर्टफोलिओमध्ये १७.८३ लाख कोटी रुपयांचे २८३ शेअर्स आहेत. आकडेवारीनुसार, कंपनीने डिसेंबर तिमाहीत टीसीएस शेअर्सची सर्वात मोठी खरेदी केली. टीसीएसचे ३,१३६ कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले. एलआयसीने या काळात एचसीएल टेक्नॉलॉजीजचीही २,२९३ कोटींना खरेदी केली आणि त्यांच्या पोर्टफोलिओमध्ये कोफोर्जचा समावेश केला. या खरेदींसह आयटी क्षेत्रातील एलआयसीची होल्डिंग्ज १.८२ लाख कोटींवरून २.१७ लाख कोटींवर पोहोचली.

### चिनी उपकरणांवरील निर्बंध होणार शिथिल

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

ऊर्जा, कोळसा उत्खननात अडथळे येत असल्याने भारताने चिनी उपकरणांवर लादलेले निर्बंध शिथील करण्याचा निर्णय घेतला आहे. तब्बल पाच वर्षांनी चिनी उपकरणांवरील निर्बंधात मोठी सवलत मिळणार आहे. भारत आणि चीनच्या सैन्यामध्ये गलवान खोऱ्यात रक्तरंजित संघर्ष झाला होता. त्यानंतर भारताने चीनमधून येणारी गुंतवणूक आणि आयातीवर निर्बंध घातले होते. तसेच, चिनी संस्थांना सरकारच्या विविध कंत्राटातून बाहेरचा रस्ता दाखवला होता. सरकारी कंत्राटाचा हा आकार तब्बल ७०० ते ७५० अब्ज डॉलर आहे. सैन्य संघर्षानंतर केंद्राने चिनी संस्थांना सरकारी कंत्राटांच्या लिलावात भाग घेण्यासाठी सरकारकडून पूर्वपरवानगीची अट घातली होती. आता सरकारी मालकीच्या ऊर्जा वितरण कंपन्यांच्या लिलावात सरकारी परवानगीव्यतिरिक्त चिनी कंपन्या सहभागी होऊ शकतील. तशीच सवलत कोळसा कंत्राटातही देण्यात आली आहे.



### कपड्यांची निर्यात मंदावली

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

एप्रिल ते जानेवारी २०२५-२६ या कालावधीत तयार कपड्यांची निर्यात अवघी १.६ टक्क्याने वाढून १३.१३ अब्ज डॉलरवर गेली आहे. एप्रिल ते जानेवारी २०२४-२५ या कालावधीत निर्यातीत घसघशीत १३.३ टक्क्यांनी वाढ झाली होती, अशी माहिती अपॅरल एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलने दिली. अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्कवाढ केल्याने भारतीय उत्पादनांची अमेरिकन बाजारपेठेतील स्पर्धात्मकता संपुष्टात आली. त्याचा सर्वाधिक फटका तयार कपड्यांना बसला आहे. जानेवारी २०२६ मध्ये तयार कपड्यांची निर्यात ३.८ टक्क्यांनी घसरली आहे. जानेवारी २०२५ मध्ये निर्यातीत ७.२ टक्क्यांची वाढ झाली होती. भारताने ३७ देशांशी मुक्त व्यापार करार केले आहेत. येत्या कालावधीत फायदा कपडे निर्यातीला होईल, अशी अपेक्षा विश्लेषकांनी व्यक्त केली.




# ई-कचऱ्यात लपलंय खनिज; देशात १५ लाख टन ई-कचऱ्याची निर्मिती

## कचरा प्रक्रियेवर भर देण्याची तज्ज्ञांची मागणी

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

लिथियम, निकेल, कोबाल्ट अशा धातूंवरील भारताचे विदेशावरील अवलंबित्व मोठे आहे. दुसरीकडे भारतात दरवर्षी लाखो टन ई-कचरा तयार होतो. या कचऱ्याचा पुनर्वापर केल्यास भारताला बरेचसे धातू पुन्हा मिळवता येतील. त्यामुळे ई-कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची उभारणी करण्याची मागणी तज्ज्ञांकडून केली जात आहे.


गेल्या वर्षी भारतात सुमारे १५ लाख टन ई-कचरा निर्माण झाला. जवळपास २ लाख ट्रक भरेल इतका हा कचरा आहे. काही तज्ज्ञांनुसार हा आकडा दुप्पट असण्याची शक्यता आहे. स्मार्ट फोनपासून ते लढाऊ विमाने आणि इलेक्ट्रिक कारपर्यंत विविध उद्योगांमध्ये दुर्मीळ खनिजांचा वापर केला जातो. या उत्पादनांना आवश्यक असलेले लिथियम आणि कोबाल्टसारखी महत्त्वाची खनिजे या कचऱ्यातून पुन्हा मिळवता येतील. सध्या दुर्मीळ खनिजांच्या उत्पादनात आणि त्यावरील प्रक्रियेत चीनचे वर्चस्व आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारही प्रयत्नशील आहे. या खनिजांची मागणी येत्या कालावधीत वाढती राहणार आहे. देशांतर्गत खनिज उत्पादन वेग घेण्यासाठी दशकभराचा कालावधी लागेल. म्हणूनच, इलेक्ट्रॉनिक कचऱ्यातून खनिज मिळविण्यावर भर देण्याची मागणी होऊ लागली आहे.

पुनर्वापर उद्योगात मोठ्या प्रमाणात वाढ करण्याच्या दृष्टीने एक्सटेंडेड प्रोड्यूसर रिस्पाँसिबिलिटी (ईपीआर) नियमाने प्राथमिक उत्प्रेरक म्हणून काम केले आहे. असे लिथियम काढू शकणाऱ्या काही भारतीय सुविधांपैकी एक असलेल्या एक्सिगो रिसायकलिंगचे व्यवस्थापकीय संचालक रमन सिंग म्हणाले.

ईपीआर पूर्णपणे लागू होण्यापूर्वी, ९९ टक्के ई-कचरा अनौपचारिक क्षेत्रात पुनर्वापर केला जात होता. ॲटेरो रिसायकलिंगचे नितीन गुप्ता म्हणाले की, ई-कचऱ्यातून आपण किमान २२ गंभीर खनिजे मिळवू शकतो.

### यातून मिळतील खनिजे

● खराब बॅटरीमधून लिथियम, कोबाल्ट आणि निकेल मिळू शकते. एलईडी स्क्रीनमध्ये जर्मेनियम असते. सर्किट बोर्डमध्ये प्लॅटिनम आणि पॅलेडियम असते. तर, हार्ड डिस्कमध्ये दुर्मीळ खनिजांचा भरणा असतो.



### अशी केली जाते प्रक्रिया

● हरियाणात एक्सिगो रिसायकलिंगचा विस्तीर्ण प्रकल्प आहे. एक मशिन ई-स्कूटरमधील बॅटरी जेट-ब्लॅक पावडरमध्ये रूपांतरित करते. नंतर हे साहित्य वाइन-रेड द्रवात मिश्रण केले जाते. त्यानंतर ते गाळून घेतले जाते. पुन्हा त्याचे बाष्पीभवन करण्यात येते. शेवटी बारीक पांढऱ्या पावडरमध्ये म्हणजेच लिथियममध्ये ते रूपांतरित केले जाते.

### ...तर कचरा बनेल धोकादायक

● नीति आयोगाने अनौपचारिक पद्धतीने खनिजे मिळविणे पर्यावरणासाठी अधिक धोकादायक असल्याचे सांगितले आहे. अनेकदा ई-कचरा उघड्यावर जाळला जातो. असुरक्षित विघटनामुळे कामगार विषारी धुराच्या संपर्कात येतात. त्यांना अनेक आजार जडू शकतात. याशिवाय माती आणि पाणी दूषित होते.

### पुनर्वापरात अजूनही मागेच

● एका अंदाजानुसार, शहरी खाणकाम ई-कचऱ्यापासून दरवर्षी सहा अब्ज डॉलरपर्यंत खनिजे मिळवता येतील. सध्या बहुतेक ई-कचरा अनौपचारिक क्षेत्रात विघटित केला जातो. त्यात तांबे आणि ॲल्युमिनियमसारखे धातू मिळविण्यात येतात. चीन आणि युरोपियन युनियनच्या तुलनेत भारताची औपचारिक पुनर्वापर क्षमता मर्यादित आहे. त्यामुळे केंद्र सरकारने गेल्या वर्षी महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुनर्वापराला चालना देण्यासाठी १७ कोटी डॉलरची तरतूद केली आहे. ऑक्टोबरमध्ये संयुक्त राष्ट्रविकास कार्यक्रमाच्या नोंदीनुसार, भारतातील ८० टक्क्यांहून अधिक ई-कचरा अजूनही अनौपचारिकपणे प्रक्रिया केला जातो.

# गोखले एज्युकेशन सोसायटीचा ज्ञानयज्ञ!

**शिक्षणक्षेत्रामध्ये दर्जेदार शिक्षणातून कर्तृत्त्वाचा ठसा उमटविलेली गोखले एज्युकेशन सोसायटी आज १९ फेब्रुवारी २०२६ रोजी १०९ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने संस्थेच्या शतकोत्तर वाटचालीवर टाकलेला प्रकाश !**




नाशिक : कॉलेजरोड येथे निसर्गरम्य परिसरामध्ये साकारलेला भव्य प्रकल्प - गुरूदक्षिणा

थोर देशभक्त, विचारवंत व समाज सुधारक नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विचारांनी व कार्याने प्रेरित झालेले एक ध्येयनिष्ठ शिक्षक प्राचार्य त्र्यंबक आप्पाजी तथा टी. ए. कुलकर्णी. नामदार गोखले यांना दिनांक १९ फेब्रुवारी १९१५ रोजी वयाच्या ४९ व्या वर्षी देवाज्ञा झाली. त्यांच्या तृतीय स्मृतिदिनी म्हणजेच दिनांक १९ फेब्रुवारी १९१८ रोजी प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांनी गोखले एज्युकेशन सोसायटीची मुंबई येथे स्थापना केली आणि शिक्षणक्षेत्रातील एक ज्ञानयज्ञ प्रज्वलित केला.

सन १९१२ मध्ये प्राचार्य टी. ए. कुलकर्णी यांनी गिरगाव येथे स्थापन केलेली शाळा शेठ डी. जी. टी. हायस्कूल संस्थेस समर्पित केली. शेठ डी. जी. टी. हायस्कूल 'गोखले एज्युकेशन सोसायटीची मातृसंस्था' म्हणून ओळखली जाते. गिरणी कामगारांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी सप्टेंबर १९१९ मध्ये परळ येथे आर. एम. भट हायस्कूल स्थापन केले. बोर्डी आणि आजूबाजूच्या वाड्या वस्त्यांवरील आदिवासींच्या शिक्षणासाठी १९२० मध्ये एस. पी. एच. हायस्कूल बोर्डी येथे सुरू केले. त्याकाळी उच्च शिक्षणाची सोय फक्त मुंबई व पुणे यासारख्या मोठ्या शहरांमध्येच होती. उत्तर महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी संस्थेने नाशिक येथे जून १९२४ मध्ये एच. पी. टी. महाविद्यालय सुरू केले. सुरुवातीला कला विद्याशाखेचे शिक्षण देणाऱ्या या महाविद्यालयात सन १९४८ मध्ये विज्ञान शाखेचे वर्ग सुरू करण्यात आले. एच. पी. टी. महाविद्यालय हे खऱ्या अर्थाने 'उत्तर महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाची मातृसंस्था' म्हणून गौरविले जाते.

जून १९५७ मध्ये उत्तर महाराष्ट्रातील पहिले वाणिज्य महाविद्यालय, बी. वाय. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक येथे स्थापन केले. नाशिक रोड, देवळाली, भगूर आणि आजूबाजूच्या खेड्यातील विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी जून १९६३ मध्ये चांडक - बिटको - चांडक महाविद्यालयाची नाशिक रोड येथे स्थापना करण्यात आली. संस्थेचे माजी सचिव व महासंचालक स्व. सर डॉ. मो. स.गोसावी यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने १९६८ मध्ये बी. वाय. के. महाविद्यालयामध्ये एम. बी. ए. अभ्यासक्रम सुरू करून विद्यापीठीय व्यवस्थापन शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

सन १९६९ मध्ये नाशिकला न. ब. ठाकूर विधी महाविद्यालय तसेच संगमनेरला शिक्षण शास्त्र महाविद्यालय, १९७० मध्ये परळ येथे शिक्षण शास्त्र महाविद्यालय, १९७५ मध्ये कोसबाड येथे देशातील पहिले कृषी विज्ञान केंद्र, १९७९ मध्ये बोरिवली येथील महाविद्यालय, १९८२ मध्ये जव्हार येथे कला व वाणिज्य महाविद्यालय, १९८४ मध्ये परळला पहिले रात्र महाविद्यालय, १९८५ मध्ये नाशिक येथे उत्तर महाराष्ट्रातील पहिले महिला महाविद्यालय, एस. एम. आर. के. - बी. के. - ए. के. महिला महाविद्यालय, १९८६ मध्ये एच. ए. एल. महाविद्यालय, १९९४ मध्ये बोर्डी येथे एन. बी. मेहता विज्ञान महाविद्यालय, १९९८ मध्ये श्रीवर्धन येथे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि २०१९ मध्ये खारघर येथे विधी महाविद्यालय स्थापन करण्यात आले.

संस्थेचे कार्य मुंबईतून सुरु झाले असून, मुंबई विभागामध्ये परळ, बोरीवली, श्रीवर्धन व खारघर अशी चार केंद्रे कार्यरत आहेत. परळ केंद्रामध्ये आर. एम. भट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज (इंग्रजी व मराठी माध्यम), परळ रात्र शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, पूर्व-प्राथमिक व प्राथमिक शाळा (इंग्रजी व मराठी माध्यम), डॉ. टी. के. टोपे कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय या युनिट्सच्या माध्यमातून पूर्व प्राथमिक ते पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

बोरीवली (पश्चिम) परिसरामध्ये बालक मंदिर (पूर्व प्राथमिक मराठी व इंग्रजी माध्यम), शिशु विकास मंदिर (मराठी व इंग्रजी माध्यम), नामदार गोपाळ कृष्ण गोखले हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज (सायन्स) (इंग्रजी व मराठी माध्यम) या शाळा तसेच मुंबई उपनगरातील पहिले महाविद्यालय श्री. भाऊसाहेब वर्तक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व शेठ के. व्ही. पारेख कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय यातून दर्जेदार शिक्षणातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविले जात आहे.

खारघर येथे पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा (इंग्रजी व मराठी माध्यम) तसेच विधी महाविद्यालय आहे. श्रीवर्धन येथे आराठीची न्यू इंग्लिश स्कूल व शिस्ते बोर्ली पंचातनची न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल या शाळा पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक स्तरावर दर्जेदार शिक्षण वाजवी शुल्कामध्ये देत असून ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मैलिक कार्य करीत आहेत. तसेच या परिसरामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांचा उच्चशिक्षणातील सहभाग वाढविला जात आहे.

बोरीवलीस्थित श्री. भाऊसाहेब वर्तक महाविद्यालयामध्ये बी. ए. व बी. कॉम. या अनुदानित तत्वावरील नियमित अभ्यासक्रमांबरोबरच बी. कॉम. (मॅनेजमेंट स्टडीज), बी. कॉम. (अकौंटिंग ॲण्ड फायनान्स), बी. कॉम. (बँकिंग ॲण्ड इन्शुरन्स), बी. एस्सी. (इनफर्मेशन टेक्नोलॉजी) व एम. कॉम. (ॲडव्हान्स अकौंटन्सी) हे स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील व्यावसायिक अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

काळाची गरज ओळखून संस्थेने परिचारिका, संगणक शास्त्र, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र व तंत्रनिकेतन यासारखी महाविद्यालये सुरू करून त्यातून अनेक गतिमान व व्यावसायिक अभ्यासक्रम यशस्वीपणे राबविले जात आहेत. संस्थेने स्व. सर डॉ. मो. स. गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रकल्प हाती घेतला आहे. नाशिक, मुंबई व पालघर असे ३ विभाग तसेच नाशिक, मुंबई, पालघर, अहिल्यानगर, अमरावती व रायगड या ६ जिल्ह्यांमध्ये विस्तार, २० केंद्रे, १५२ युनिट्स, १ लाख विद्यार्थी संख्या, २००० हून अधिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी असा हा संस्थेचा आजवरचा प्रगतीचा आलेख आहे. हा विस्तार करण्यामध्ये संस्थेचे माजी सचिव स्व. सर डॉ. मो. स. गोसावी यांचा सिंहाचा वाटा आहे. या कार्यामध्ये त्यांना संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. प्राचार्य श्री. बा. पंडित यांची भक्कम साथ लाभली. जानेवारी १९७३ ते जुलै २०२३ अशी डॉ. गोसावी सरांची सचिवपदाची सुवर्ण महोत्सवी कारकीर्द म्हणजे संस्थेच्या इतिहासातील तेजस्वी ज्ञानपर्वच आहे.

शिक्षकांनी चालविलेली शिक्षण संस्था हे या संस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे. दर्जेदार शिक्षणातून जागतिक दर्जाचे नागरिक घडविणे, विद्यार्थ्यांमध्ये क्षमतांचे उन्नयन करणे आणि शिक्षकी पेशाची प्रतिष्ठा उंचविणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संस्था गेल्या १०८ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात अत्यंत तळमळीने व श्रद्धेने कार्य करीत आहे. ज्ञान प्रातिस्तु भक्तितः हे ब्रीद अंगीकारून विद्यार्थी देवो भव! व अर्लेंश ड्शश्रष-अर्लेंश झेश्रळींळली हे दोन मंत्र केंद्रस्थानी ठेवून कार्यरत असलेल्या संस्थेने गुणवत्तेची कास व उत्कृष्टतेचा ध्यास घेतला आहे. 'वाजवी शुल्कामध्ये दर्जेदार शिक्षण देणारी शिक्षणसंस्था' अशी या संस्थेची ओळख आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार, उत्कृष्ट संस्था पुरस्कार, उत्कृष्ट वार्षिक अंक पुरस्कार यासारखे पुरस्कार दरवर्षी प्रदान करून संस्थेने एक प्रेरणादायी, उपक्रमशील व सात्विक वातावरण समृद्ध केलेले आहे.

संस्थेमध्ये ठाकरसी, क्षत्रिय, चांडक, बिटको, पाठारे, कलंत्री, कपाडिया, आठवले - कुलकर्णी, मेहता, सपट, पारेख व हकीमजी या कुटुंबियांकडून मिळालेल्या उदार व बिनशर्त देणग्यांमधून ज्ञानसंकुले सुसज्ज बनली असून त्यातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य अव्याहतपणे सुरु आहे. या संस्थेने पद्मश्री भाऊसाहेब वर्तक व पद्मश्री हरिश्चंद्र पाटील असे दोन पद्मश्री दिले आहेत. पद्मश्री पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ अभिनेते श्री. अशोक सराफ हे शेठ डी. जी. टी. हायस्कूलचे नामवंत माजी विद्यार्थी आहेत. आचार्य मोरेश्वर वासुदेव दोंदे व आचार्य शंकर रामचंद्र भिसे असे दोन आचार्य, ज्ञानमहर्षी सर डॉ. मोरेश्वर सदाशिव गोसावी व शिक्षणव्रती प्राचार्य श्रीनारायण बाळकृष्ण पंडित ही अनमोल रत्ने जगाला बहाल केलेली आहेत.

आज संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा वाढता कल बघता ही संस्थेने गेल्या १०८ वर्षात केलेल्या उल्लेखनीय कार्याची फलश्रुतीच म्हणावी लागेल. संस्थेच्या सचिव व खजिनदार मा. डॉ. सौ. दीप्ती देशपांडे या संस्थेला गतिमान नेतृत्व देत आहेत. दर्जेदार शिक्षणातून लाखो विद्यार्थी आणि हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जीवनात चैतन्य फुलविणाऱ्या या अग्रगण्य व गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्थेला वर्धापन दिनानिमित्त खूप खूप शुभेच्छा !

**- डॉ. महेश दिलीप औटी**
**सहाय्यक विभागीय सचिव (मुंबई विभाग), गोखले एज्युकेशन सोसायटी**


**बेलापूर येथील मा. न्यायाधीश सो., कौटुंबिक न्यायालय, बेलापूर यांच्या न्यायालयात, नवी मुंबई**

ॲड. सरिता भोंडवे
पिटीशन ए-६९५/२०२४
निशाणी – १०

श्री. प्रतीक विष्णु मोहिते .............अर्जदार
विरूध्द
सौ. पूनम प्रतीक मोहिते ..............सामनेवाले

जाहीर नोटीस

याद्वारे सौ. पूनम प्रतीक मोहिते C/o. श्री. चंद्रकांत जाधव, राहणार ४७/बी/३, शिवाजीनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान, गोवंडी, मुंबई ४०००४३ व तमाम कुटूंबियांना कळविण्यात येते की, अर्जदाराने अर्ज हिंदु विवाह कायदा १९५५ कलम १३(१) (१अ) आणि कलम १३(१) (१ब) प्रमाणे अर्जदार यांनी बेलापूर येथील मा. न्यायाधीश सो., कौटुंबिक न्यायालय, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील सामनेवाले हे मा. न्यायालयात हजर झालेले नाहीत म्हणून समन्स व नोटीस पाठवून अंतिम कळविले होते. तरीही सामनेवाले कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देत नाहीत. सदरहू सामनेवाले हे दिलेल्या पत्त्यावर राहतात किंवा राहत नाहीत, तसेच मे. न्यायालयात हजर का होत नाहीत. याबाबतही कोणताही बोध होत नाही. म्हणून सदर अर्जातील सुनावणीकामी व न्यायनिर्णयाचे दृष्टीने पुढील अडचणी निर्माण होवू नयेत किंवा येवू नयेत म्हणून अर्जदार तर्फे सदरची जाहीर नोटीस सामनेवालेचे माहितीकरीता प्रसिध्द करीत आहोत. सदरहू दाव्याची सुनावणीची पुढील तारीख ३० मार्च, २०२६ अशी नेमण्यात आली आहे. सदर तारखेस सामनेवाले किंवा त्यांचे तर्फे कोणीही प्रतिनिधी हजर न राहिल्यास सदर सामनेवालेस या दाव्यात स्वारस्य नाही असे गृहित धरून सदर दाव्याची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
कनिष्ठ लिपिक

शिक्का

हुकूमावरून,
सही/–
प्र. प्रबंधक
कौटुंबिक न्यायालय, बेलापूर नवी मुंबई